**राजीनामा मंजुर करणे बाबत..**
श्री.प्रदिप राम जाधव, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक),
शिक्षण विभाग, पंचायत समिती जामखेड

**जिल्हा परिषद अहिल्यानगर**
**सामान्य प्रशासन विभाग-१**

जिल्हा परिषद आदेश जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/२५६६६७६/२०२५
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा:- १. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय जा.क्र.एसआरव्ही-१०९२/१०३३/ प्र.क्र.३३/९२/८ दिनांक ०२ डिसेंबर १९९७
२. इकडील आदेश जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/०६२३/१००९/२०२४ दि ३०/०७/२०२४
३. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती जामखेड, यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/३२३/ दिनांक ०६/१०/२०२५

ज्याअर्थी, गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती जामखेड यांनी त्यांचे अधिनस्त कर्मचारी श्री .प्रदिप राम जाधव, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक), शिक्षण विभाग, पंचायत समिती जामखेड, यांचा कनिष्ठ सहाय्यक (लिपीक), या पदाचा राजीनामा संदर्भ क्रमांक २ नुसार मंजुरीस्तव या कार्यालयास सादर केलेला आहे.

ज्याअर्थी, श्री प्रदिप राम जाधव, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक), हे इकडील संदर्भ क्रमांक २ च्या आदेशान्वये कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) या पदावर दिनांक ०६/०८/२०२४ रोजी शिक्षण विभाग, पंचायत समिती जामखेड येथे हजर झालेले आहेत. श्री.प्रदिप राम जाधव, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक), शिक्षण विभाग, पंचायत समिती जामखेड, यांनी कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) गट-क या पदाचा राजीनामा दिनांक ०६/१०/२०२५ रोजी दिला असुन संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार तसेच संदर्भ क्र. ३ अन्वये कार्यालय प्रमुखांनी श्री.प्रदिप राम जाधव, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक), यांचे एक महिन्याचे वेतन लेखाशिर्षाखाली भरणा करुन चलनाची प्रत सादर केलेली आहे.

संदर्भ क्रमांक ३ अन्वये श्री.प्रदिप राम जाधव, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक), शिक्षण विभाग, पंचायत समिती जामखेड, यांचेकडे कोणत्याही प्रकारचे शासकीय येणे प्रलंबित नसलेचे व कोणत्याही प्रकारची चौकशी प्रलंबित नसलेबाबतचा अहवाल प्राप्त झालेले आहे.

त्याअर्थी, संदर्भ क्रमांक १ मधील शासन निर्णयातील तरतुदीनुसार व संदर्भ क्र.३ च्या अर्जानुसार मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, मला प्रदान करणेत आलेल्या अधिकाराचा वापर करुन श्री.प्रदिप राम जाधव, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक), शिक्षण विभाग, पंचायत समिती जामखेड, यांनी कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) गट-क या पदाचा राजीनामा दिनांक ०६/१०/२०२५ रोजीपासुन दिलेला आहे. तरी श्री.प्रदिप राम जाधव, यांच्या राजीनाम्यास दिनांक ०६/१०/२०२५ पासुन मंजुरीस कार्योत्तर मान्यता देत आहे.

सदर आदेशाची नोंद संबंधितांच्या मुळ सेवापुस्तकात घेणेत यावी.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आला असुन त्याचा सांकेतांक क्रमांक 202510130401 80 असा आहे.

**Signed by Anand Subhashlal Bhandari**
**Date: 13-10-2025 11:15:47**
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

**श्री.प्रदिप राम जाधव, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक), शिक्षण विभाग, पंचायत समिती जामखेड**
**द्वारा व प्रत**:- गट शिक्षाणाधिकारी, पंचायत समिती जामखेड
**प्रत** - मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्रत - मुळ नस्ती.